विस्तारेंफिरोंनेणे ॥ २ ॥ वाणीवदेत्याचाकोणासींवि
श्वास ॥ अभयकरेंदाससत्यतई ॥ ३ ॥ तुकाह्मणेआ
धींनकरींतानई॥ पाईझालीजोडीतेणेंशुद्ध॥ ४॥
॥३३७०॥

सर्वात्मकपण ॥ माझेंहिरोननेतोकोण ॥ १ ॥ मजभ
क्तीचीआवडी ॥ हेव्हावीऐसीजोडी ॥ २ ॥ घेईनज
न्मांतरें ॥ हेचिकरावयाखरें ॥ ३ ॥ तुकाह्मणेसेवा ॥ ऋ
णीकरुनिठेऊंदेवा ॥ ४ ॥ ॥ ३३७१ ॥
आणितांतिगती हंसकावळेनहोती ॥ १ ॥ सांडासा..
रेमठारे ॥ येथेंगांठीसवेंधुरें ॥ २ ॥ नाकेवीणमोतीं ॥ उ
भ्याबाजारींफजीती ॥ ३ ॥ हुकुमदाजतुका ॥ येथेंको
णीफुंदोंनका ॥ ४ ॥ ॥ ३३७२ ॥
ढेकणासींबाजगड ॥ उतरचढकेवढी ॥ १ ॥ होतांतैसें
कळेमाव ॥ आलावावअंतरींचा ॥ २ ॥ बोरामध्येंअ
सेआळी ॥ आठोळीचभोंवती ॥ ३ ॥ पोटासाठींवेंचीच
णे ॥ राजाह्मणेतोंडेंमी ॥ ४ ॥ बेडकानेंचिखलखावा ॥
कायठावासागर ॥ ५ ॥ तुकाह्मणेऐसेंआहे ॥ कायपाहे
त्यांततें ॥ ६ ॥ ॥ ३३७३ ॥
धांवधांवगरुडध्वजा ॥ आह्माअनाथांच्याकाजा ॥ १ ॥
बहुझालोंकासावीस ॥ ह्मणोनिपाहेंतुझीवास ॥ ॥ २ ॥
असोनीयांऐसा ॥ तुजसारीखाकोवसा ॥ ३ ॥ पाहत्या
मारगें ॥ कोणीयेतोमाझ्यामागें ॥ ४ ॥ नलावावाउशी
र ॥ नेणोकांहेकेलाधीर ॥ ५ ॥ तुकाह्मणेचाली ॥ नको
चालूंधांवघाली ॥ ६ ॥ ॥ ३३७४ ॥
.ांडुरंगेपांडुरंगे ॥ माझेगंगेमाउलीये ॥ १ ॥ पाह्नाघाली
प्रेमधारा ॥ पूरक्षीरालोटोंदे ॥ २ ॥ अंगेंअंगमेळउनीं ॥
करीधणीफेडाया ॥ ३ ॥ तुकाह्मणेघेईनउड्या ॥ सांडी

नकुड्याभावना ॥ ४ ॥ ॥३३७५॥
गजेंद्रतोपशूआर्तेमोकलीला ॥ तोतुजस्मरलापांडुरं
गा॥ १ ॥ त्यासाठींगरुडसांडूनिधांवसी ॥ माझ्याझळं
बसीदीनानाथ॥ २ ॥ धेनुवत्सावरीझेंपघालीजैसी॥तै
सेंगजेंद्रासीसोडवीलें ॥ ३ ॥ तुकाह्मणेब्रीदबांधलेंया
गांठीं॥ भक्तासींसंकटींरक्षावया॥ ४॥ ॥३३७६॥
चारीवेदजयासाठीं ॥ त्याचेंनामधराकंठीं ॥ १ ॥ नक
रींआणिकसाधन॥ कष्टसीकांवायांवीण॥२॥ अठरा
पुराणांचेपोटीं ॥ नामावीणनाहींगोष्टी ॥ ३ ॥ गीताजे
णेंउपदेशिली ॥ तेहेविटेवरीमाउली ॥ ४ ॥ तुकाह्मणे
सारधरी॥ वाचेहरीनामउच्चारी॥ ५॥ ॥३३७७॥
पाहातांठायांठाव ॥ जातोअंतरोनीदेव ॥ १ ॥ नयेवा
टोंगुणदोषी॥ मनजतनयेविशीं॥ २ ॥ त्रिविधदेहपरि
चारा ॥ जनींजनार्दनखरा॥ ३ ॥ तुकाह्मणेधीरें ॥ वी
णकैसेंहोतेंबरें ॥ ४ ॥ ॥३३७८॥
नामसंकीर्तनसाधनहेंसोपें ॥ जळतीलपापेंजन्मांतरीं
चीं ॥ १ ॥ नलगतीसायासजावेंवनांतरा ॥ सुखेंयेतो
घरानारायण॥ २ ॥ठाईंचबैसोनिकरायेकचित्त॥ आ
वडींअनंतआळवावा ॥ ३ ॥ रामकृष्णहरिविठ्ठलकेश
वा॥ मंत्रहाजपावासर्वकाळ ॥४॥ यावीणतेंनाहींदुस
रेंसाधन ॥ वाहातसेआणविठोबाची ॥ ५ ॥ तुकाह्मणे
सोपेंआहेसर्वांहूनी ॥ शाहाणातोधणीघेतोयेथें॥ ६ ॥
॥३३७९॥

भावीकाचें काज अंगें देव करी ॥ काढीध मांघरीं उच्छिष्ट
तें ॥ १ ॥ उच्छिष्टतीं फळें खाय भिल्लणीचीं ॥ आवडीत
यांचीमोठीदेवा ॥ २ ॥ कायदेवाघरींनमिळेचिअन्न ॥
मागेभाजीपानद्रौपदीसीं ॥ ३ ॥ अर्जुनाचींघोडींधूत
लींअनंतें ॥ संकटेंबहुतेंनिवारिलीं ॥ ४ ॥ तुकाह्मणेऐ
सींआवडतीलडिवाळें ॥ जाणीवेचेआळेंतोंडदेवा
॥५॥ ॥३३८०॥

सांवळेंरूपडेंचोरटेंचित्ताचें ॥ उभेंपंढरीचेविटेवरी ॥
॥१॥डोळियांचीधणीपाहीनमीपुरे॥तयालागींझुरेमन
माझें॥ २ ॥ आनगोडकांहींनलगेसंसार ॥ राहिलेंअंत
रींपायतूझे ॥ ३ ॥ प्राणरिघोपाहेकुडियेसांडूनी ॥ श्रीमु
खनयनींनदेखतां ॥ ४ ॥ चित्तहेंमोहिलेंनंदाच्यानंदनें ॥
तुकाह्मणेयेणेंगरुडध्वजें ॥ ५ ॥ ॥३३८१॥

ऐकाऐकाभाविकजन ॥ कोणकोणव्हालते ॥ १ ॥ ता
किंकांचाटाकासंग ॥ पांडुरंगस्मराहो ॥ २ ॥ नकोशोधुं
मतांतरें ॥ नुमगेखरेंबुडाल ॥ ३ ॥ कलीमध्येंदासतुका ॥
जातोलोकांसांगत ॥ ४ ॥ ॥ ३३८२ ॥

आपुलियाअंगेंतोडीमायाजाळ ॥ ऐसेंनाहींबळकों
णाअंगीं ॥ १ ॥ रांडापोरेंत्यागकरीकुटुंबाचा ॥ नावरेहे
वाचाआणिमन ॥ २ ॥ मुक्तझालोंऐसेंबोलोंजायवाचे ॥
तुकाह्मणेदुःखेंबांधलातो ॥ ३ ॥ ॥ ३३८३ ॥

आलियाआतीताह्मणतसापुढें ॥ आपुलेंरोकडेंसत्वजा
य ॥ १ ॥ कायत्याचाभारघेऊनिमस्तकीं ॥ हीनकर्मलोकीं

ह्मणावया ॥ २ ॥ द्वारींहाककैसेंकरवतेंभोजन ॥ रुचित
रीअन्नकैसेंदेतें ॥ ३ ॥ तुकाह्मणेध्वजउभारिलाकर ॥
शक्तिहीउदारकायझाली ॥ ४ ॥ ॥ ३३८४ ॥
जेथेंलक्ष्मीचावास ॥ गंगाआलीपापनाश ॥ १ ॥ तेंम्यां
हृदयींधरिलें ॥ तापशमनपाउलें ॥ २ ॥ ठावधरिलासं
तजनीं ॥ सुखेंराहिलेलपोनी ॥ ३ ॥ तुकाह्मणेवाकी ॥
भाटझालेतिहींलोकीं ॥ ४ ॥ ॥ ३३८५ ॥
रूपींगुंतलेलोचन ॥ चरणींस्थिरावलेंमन ॥ १ ॥ देहभा
वहारपला ॥ तुजपाहातांविठ्ठला ॥ २ ॥ कळोंनेदीसुख
दुःख ॥ तान्हहारपलीभूक ॥ ३ ॥ तुकाह्मणेनव्हेपरती ॥
तुझ्यादर्शनेंमागुतीं ॥ ४ ॥ ॥ ३३८६ ॥
जाणतेंलेंकरूं ॥ मातालागेदूरधरूं ॥ १ ॥ तैसेंनकरींकृ
पावंते ॥ पांडुरंगेमाझेमाते ॥ २ ॥ नाहींमुक्ताफळा ॥ भे
टीमागुतीत्याजळा ॥ ३ ॥ तुकाह्मणेलोणी ॥ ताकसां
डीनिवडूनी ॥ ४ ॥ ॥ ३३८७ ॥
तुजविणकोणा ॥ शरणजाऊंनारायणा ॥ १ ॥ ऐसान
देखेंमीकोणी ॥ दुजातीहींत्रिभुवनीं ॥ २ ॥ पाहिलींपु
राणें ॥ धांडोळलींदरुशनें ॥ ३ ॥ तुकाह्मणेठाईं ॥ जडो
निठेलोतुझेपाईं ॥ ४ ॥ ॥ ३३८८ ॥
ऐसेंभाग्यकईंलाहताहोईन ॥ अवघेंदेखेंजनब्रह्मरूप ॥
॥ १ ॥ मगतयासुखाअंतनाहींपार ॥ आनंदेंसागरहेला
वती ॥ २ ॥ शांतिक्षमादयामूर्तीमंतअंगीं ॥ परावृत्ता
संगींकामादिक ॥ ३ ॥ विवेकासहितवैराग्याचेंबळ ॥

धगधगीतोज्वाळअग्निजैसा ॥ ४ ॥ भक्तिनवविधाभा
वशुद्धवरी ॥ अलंकारावरीमुगुटमणी ॥ ५ ॥ तुकाह्मणे
माझीपुरवावीवासना ॥ कोणनारायणातुजविण ॥
॥ ६ ॥ ॥ ३३८९ ॥

कासयाकरावेंतपाचेडोंगर ॥ आणिकअपारदुःखरा
शी ॥ १ ॥ कासयाफिरावेंआणिकतेदेश ॥ दावितील
आसपुढेंलाभ ॥ २ ॥ कासयापूजावेंआणिकदैवतें ॥
पोटभरेंतेंयेलाभनाहीं ॥ ३ ॥ कासयाकरावेमुक्तीचेसा
यास ॥ मिळेंपंढरीसफुकासाठीं ॥ ४ ॥ तुकाह्मणेकरींकी
र्तनपसारा ॥ लाभयेईलघरापाहिजेतो ॥ ५ ॥ ३३९० ॥

वैष्णवनमुनीविप्रांचासन्मान ॥ करावाआपणघेऊंन
ये ॥ १ ॥ प्रभुझालातरीसंसाराचादास ॥ विहितहेंत्यास
त्याचासेवा ॥ २ ॥ तुकाह्मणेहेचिआशिर्वादेंबळी ॥ जाई
लतोछळीनरकासीं ॥ ३ ॥ ॥ ३३९१ ॥

देववसेज्यांचेचित्तीं ॥ त्यांचीघडावीसंगती ॥ १ ॥ ऐ
सेंआवडतेंमना ॥ देवापुरवावीवासना ॥ २ ॥ हरिज
नाभेटी ॥ नव्हेअंगसंगतुटी ॥ ३ ॥ तुकाह्मणेजिणें ॥
भलेंसंतसंघट्टणे ॥ ४ ॥ ॥ ३३९२ ॥

भागशीणगेला ॥ माझासकळविठ्ठला ॥ १ ॥ तुझाह्म
णवितोंदास ॥ केलीउच्छिष्टाचीआस ॥ २ ॥ राहिलीत
ळमळ ॥ तईपासुनिसकळ ॥ ३ ॥ तुकाह्मणेधालें ॥ पो
टऐसेंकळोंआलें ॥ ४ ॥ ॥ ३३९३ ॥

रायाचेसेवक ॥ सेवटीलपीडींरंक ॥ १ ॥ होनाहीनाव

कवणा ॥ कांहोनेणानारायणा ॥ २ ॥ परिसेसीभेटी ॥ नव्हेलोहपणातुटी ॥ ३ ॥ तुझेंनामकंठीं ॥ तुक्याकाळा सवेंभेटी ॥ ४ ॥ ॥ ३३९४ ॥

सुखरूपऐसेकोणदुजेसांगा ॥ माझ्यापांडुरंगासारिखे ते ॥ १ ॥ नलगेहिंडणेंमुंडणेंतेंकांहीं ॥ साधनाचीनाहीं आटाआटी ॥ २ ॥ चंद्रभागेस्नानविधितोहरिकथा ॥ समाधानचित्तासर्वकाळ ॥ ३ ॥ तुकाह्मणेकालावैकुंठीं दुर्लभ ॥ विशेषतोलाभसंतसंगें ॥ ४ ॥ ॥ ३३९५ ॥

नसतांअधिकार ॥ उपदेशासीबलात्कार ॥ तरीतेकेले चार ॥ माकडआणिगारुडी ॥ १ ॥ धन्यधन्यराज्यबोल ॥ व्यथारंजवणेंफोल ॥ नाहींतेथेंबोल ॥ बीजवेंची मूर्खतो ॥ २ ॥ नयेबांधोंगांठी ॥ पदराआणिऐसीतुटी ॥ असोनिकसोटी ॥ शिष्टाचारअनुभव ॥ ३ ॥ उपदेशी तुका ॥ मेघवृष्टीनेंआईका ॥ संकल्पासीधोका ॥ सहज तेउत्तम ॥ ४ ॥ ॥ ३३९६ ॥

घालूनियांमापीं ॥ देवभक्तबैसलेजपीं ॥ १ ॥ तैसी होतीसांडउलंडी ॥ निजबीजाचीमुरकंडी ॥ २ ॥ अमूपीं उरवते ॥ आपणवोसआपणयातें ॥ ३ ॥ देवआतांझा ला ॥ उगवेसंकोचगहिला ॥ ४ ॥ अखंडनेलेवेठी ॥ भार सत्याविणगांठी ॥ ५ ॥ गंगेतरीआड ॥ करितेकरविते द्वाड ॥ ६ ॥ तुकाह्मणेवळें ॥ उपदेशाचेंतोंडकाळें ॥ ॥ ७ ॥ ॥ ३३९७ ॥

उंबरांतीलकीटका ॥ हेंचिब्रह्मांडऐसेंलेखा ॥ १ ॥ ऐसींउ

बरेंकितीझाडीं ॥ ऐसींझाडेंकितीनवखंडीं ॥ २ ॥ हेंचिब्र
ह्मांडआह्मासी॥ऐसीअगणितअंडकोशीं॥ ३ ॥विराटा
च्याअंगींतैसे ॥मोजूंजातांअगणितकेंश ॥४॥ऐशावि
राटाच्याकोटी ॥ वसतातीज्याच्यापोटीं॥ ५ ॥तोहानंदा
चाबाळमुकुंद॥ तान्हाह्मणवीपरमानंद ॥ ६ ॥ तैसी
अगम्यईश्वरीलीला ॥ ब्रह्मानंदींगम्यतुक्याला ॥ ७॥

॥ ३३९८ ॥

ब्रह्मज्ञानतरीयेकेदिवशींकळे ॥ तात्काळहागळेअभि
मान॥ १ ॥ अभिमानलागेशुकाचियेपाठी ॥ व्यासेंउ
फराटीदृष्टिकेली ॥ २ ॥ जनकभेटीसीपाठविलातेणें ॥
अभिमाननाणेखोटेंकेलें ॥ ३ ॥ खोटेंकरूनीयांलावी
लाअभ्यासीं ॥ मेरुशिखरासीशूकगेला ॥ ४ ॥ जाऊ
नीयांतेथेंसाधीलीसमाधी॥तुकाह्मणेतधींहोतोंआह्मी
॥ ५ ॥ ॥ ३३९९ ॥

सहजपावतांभगवंतीं ॥ परिहीविकल्पेंपरती ॥ फुका
चीहेचित्तीं ॥ आठवणकांनधरिती ॥ १ ॥ हरिव्यापक
सर्वगत ॥ हातवमुख्यत्वेंवेदांत ॥ चिंतनासीचित्त ॥ अ
सोंद्यावेंसावध ॥ २ ॥ बिरज्याहोमयाचिनावें ॥ देहन
व्हेमीजाणावें ॥ मगकांजीयावें ॥ वरीलागेसंकल्पा ॥
॥ ३ ॥ कामक्रोधदेहमलिन ॥ स्वाहाकरींकैंचेंपुण्य ॥ मं
त्रींपूजियेलायज्ञ ॥ मनमुंडणनव्हेची ॥ ४ ॥ अनन्यभ
क्तीचेउपाय ॥ तेयाविठोबाचेपाय ॥ ध्याईलतेकाय ॥
चुकोंजाणेमारग ॥ ५॥ आतांसांगेतुका ॥ येकतुह्मीचु

कोंनका॥सांडिमांडिधोका ॥ शरणरिघतांगोमटे॥
॥६॥ ॥३४००॥

आह्मीजाणावेंतेंकाई ॥तुझेंवर्मकोणेठाई ॥ अंतपार नाहीं ॥ऐसेंश्रुतीबोलती ॥ १ ॥होईमजतैसा॥साना सकुमारह्रषीकेशा ॥ पुरवींमाझीआशा॥भुजाचारी दाखवीं॥ २ ॥खालतासत्यहीपाताळा ॥ वरतास्वर्गा हुनिढिसाळा ॥ तोमीमस्यकडोळां ॥ कैसापाहूंआपु ल्या॥ ३॥मजआहेहाभरवसा॥पुढेंहोसीतयातैसा॥ पंढरिनिवासा॥ तुकाह्मणेगाविठोबा॥ ४॥३४०१॥

वृक्षवल्लीआह्मासोयरींवनचरें॥पक्षीहिसुस्वरें आळवी ती॥ १ ॥ येणेंसुखेंरुचेयेकांताचावास ॥ नाहीगुणदो षअंगायेत॥ २ ॥आकाशमंडपपृथ्वीचेंआसन॥रमे तेथेमनक्रीडाकरूं ॥ ३ ॥ कंथाकमंडलूदेहउपचारा॥ जाणवीतोवाराअवसरु ॥ ४ ॥ हरिकथाभोजनपरव डीविस्तार ॥ करूनिप्रकारसेऊंरुचि॥ ५ ॥ तुकाह्मणे होयमनासीसंवाद॥आपुलाचीवादआपणासी॥ ६॥
॥३४०२॥

अनंतब्रह्मांडें॥एकेरोमींऐसेंधेंडें॥ १ ॥तोहागवळीया च्याघरीं॥उंबराचढतांटेंकाधरी॥२॥मारियेलेदैत्यगा ढे॥ज्याचेपुराणींपवाडे॥ ३॥तुकाह्मणेकळा॥अंगीं जयाच्यासकळा॥ ४॥ ॥३४०३॥

सावधहोऐसेकायतेविचारा ॥ आलेहोसंसारासकळ ही॥१॥अंतींसमयाचाकरणेविचार ॥वेंचीतीसादरघ

टिकापळें ॥ २ ॥ मंगळहेंनोव्हेकन्यापुत्रादिक ॥ राहि
लालौकीकअंतरपाट ॥३॥ तुकाह्मणेदेवअंतरलादुरी॥
डोळियाअंधारींपडिलीसे ॥ ४ ॥ ॥ ३४०४ ॥
लवणमेळवितांजळें ॥ कायउरेलतेंनिराळें ॥ १ ॥ तैसा
समरसझालों ॥ तुजमाजीहारपलों ॥ २ ॥ अग्निकर्पूरा
च्यामेळीं ॥ कायउरलीकाजळी ॥ ३ ॥ तुकाह्मणेहोती॥
तुझीमाझीयेकजोती ॥ ४ ॥ ॥ ३४०५ ॥
सुखनाहींकोठेआलीयासंसारीं ॥ वायांहावभरिहोऊं
नका ॥ १ ॥ दुःखबांधवडीआहेहासंसार ॥ सुखाचावि
चारनाहींकोठे ॥ २ ॥ चौदाकल्पेंवरीआयुष्यजयाला॥
परीतोराहीलाताटिखालीं ॥ ३ ॥ तुकाह्मणेवेगींजाय
सुटोनीयां॥धरूनिह्रदयामाजीहरी ॥४॥ ॥ ३४०६ ॥
तुजकरितांहोयऐसेंकांहींनाहीं॥डोंगराचीराईरंकराणा
॥ १ ॥ अशुभाचेंशुभकरितांतुजकांहीं ॥ अवघडनाहीं
पांडुरंगा॥ २॥सोळासहस्त्रनारीब्रह्मचारीकैसा॥निराहा
रिदुर्वासानवलनव्हे ॥ ३॥ पंचहेभ्रतारद्रौपदीतीसती॥
करितांपितृशांतीपुण्यधर्मा ॥ ४ ॥ दशरथापातकब्रह्मह
त्येसी ॥ नवलत्याचेकुशींजन्मतुझा ॥ ५॥ मुनेश्वरादोष
नाहींअणुमात्र ॥ भांडवितांसूत्रवधहोती ॥ ६ ॥ तुका
ह्मणेमाझेदोषतेहेकाई ॥ सत्यतुझेपाईंझालोंठेवा ॥ ७॥
॥ ३४०७ ॥
उभ्याबाजारांतकथा ॥ हेतोनावडेपंढरिनाथा ॥ १ ॥
अवघेंपोटासाठींसोंग ॥ तेथेकैंचापांडुरंग ॥ २ ॥ लावी

अनुसंधान॥ कांहींदेईललक्षणउन॥ ३ ॥ कायकेलेंरांड
लेंका॥ तुलाराजीनाहींतुका॥ ४॥ ॥ ३४०८॥
असोतलोकांचेबोलशिरावरी ॥ माझिमजवरीविठा
बाई ॥ १ ॥ आपंगिलेंमजआहेतेरूपाळु॥ बहुतकन
वाळुअंतरींची ॥ २ ॥ वेदशास्त्रजीसीवर्णीतीपुराणीं॥
तीचेमीपोसणेलडिवाळा॥ ३ ॥ जीचेंनामकामधेनुक
ल्पतरु॥ तिचेंमीलेंकरूतुकाह्मणे॥ ४॥ ॥ ३४०९॥
वाराणसीगयापाहिलीद्वारका॥ परिनयेतुकापंढरिच्या
॥ १ ॥ पंढरीसीनाहींकोणाअभिमान॥ पायांपडेजनये
कमेकां॥ २ ॥ तुकाह्मणेजाययेकवेळापंढरी॥ तयाचि
येघरींयमनये॥ ३ ॥ ॥ ३४१०॥
सांडोनीयांसर्वलौकीकाचीलाज॥ आळवायदुराजभ
क्तिभावें॥ १॥ पाहोनीयांझाडेंवरबडिलापाला॥ खाऊ
निविठ्ठलाआळवावें॥ २ ॥ वेंचूनियांचिंध्याभरोनियां
धागा॥ गुंडाळूनीढुंगाआळवावें॥ ३॥ तुकाह्मणेऐसेंमां
डील्यानिर्वाण॥ तयानारायणउपेक्षीना॥ ४॥ ३४११॥
दत्याचियेअंगींनिघेताकलोणी ॥ येकामोलेंदोन्हीमा
गूंनये॥ १ ॥ आकाशाचेपोटींचंद्रतारांगणें॥ दोहींसी
समानपाहोंनये॥ २ ॥ पृथवीच्यापोटींहिरागारगोटी॥
दोहींसीसवसाठीकरूंनये॥ ३ ॥ तुकाह्मणेतैसेसंतआ
णिजन॥ दोहींसीसमानभजूंनये ॥ ४ ॥ ३४१२ ॥
कायधर्मानीत॥ तुह्माशिकवावेंहित॥ १ ॥ अवघेरचि
येलेहेळा॥ लीलाब्रह्मांडसकळा॥ २ ॥ नाममहादेव॥

येथेनिवडीलाभाव ॥ ३ ॥ तुकाह्मणेवेळे ॥ माझेतुझा कांनकळे ॥ ४ ॥ ॥ ३४१३ ॥

भांडावेंतेंगोड ॥ पुरेसकळहिकोड ॥ १ ॥ ऐशाघरींचीया मोळा ॥ ठावनिकटजवळा ॥ २ ॥ हांकदेतांदारीं ॥ येती जवळीसामोरी ॥ ३ ॥ तुकाह्मणेशिवे ॥ मागीलतेंहातीं घावें ॥ ४ ॥ ॥ ३४१४ ॥

तेरादिवसझालेनिश्चक्रकरितां ॥ नपवसीअनंतामा यबापा ॥ १ ॥ बोधाचीहेखोळघेउनिबैसलासी ॥ का यत्दृषीकेशीझालेंतुज ॥ २ ॥ तुजवरीआतांप्राणमीत्य जीन ॥ हत्यामीघालीनपांडुरंगा ॥ ३ ॥ तुकाह्मणेआ तांमांडीलेंनिर्वाण ॥ प्राणहासांडीनतुजवरी ॥ ४ ॥ ॥ ३४१५ ॥

लोकफारवाखाअमंगळझाला ॥ त्याचात्यागकेलापां डुरंगा ॥ १ ॥ विषयींचेवलोंमीपणामुकलों ॥ शरणतु जआलोंपांडुरंगा ॥ २ ॥ घरदारअवघींझालींनाराय णा ॥ जीवींच्याजीवनापांडुरंगा ॥ ३ ॥ तुकाह्मणेबहुझा लोंकासाविसी ॥ धांवत्दृषीकेशीआलिंगींमज ॥ ४ ॥ ॥ ३४१६ ॥

करिसीकींनकरिसीमाझाअंगीकार ॥ हामजविचार पडिलादेवा ॥ १ ॥ देशीकींनदेशीपायांचेंदर्शन ॥ ह्मण ऊनिमनस्थीरनाहीं ॥ २ ॥ बोलसीकींनबोलसीमज सवेंदेवा ॥ ह्मणऊनिजीवाभयवाटे ॥ ३ ॥ होईलकांन होयतुजमाझाआठव ॥ पडिलासंदेहहाचिमज ॥ ४ ॥

तुकाह्मणेमीतोकमाईचेहीन ॥ ह्मणऊनिशीणकरींदे
वा॥५॥ ॥३४१७॥
ऐसामाझाकोण आहेभीडभार॥नावाचामीफारवायां
गेलों॥१॥कायसेवारुजूआहेसत्ताबळ॥तेंमजराऊ
ळकृपाकरी॥२॥काययातीशुद्धहीनकुळकर्म॥तेणेंपडे
वर्मतुझेठाई॥३॥कोणतपोनिधिदानधर्मशीळ॥अं
गींयेकबळआहेसत्ता॥४॥तुकाह्मणेवायांझालोंभू
मीभार॥होईलविचारकायनेणों॥५॥ ॥३४१८॥
साचमजकायकळोंनयेदेवा ॥ कायतुझीसेवाकांहे
नव्हे ॥१॥ करावेंतेंबरेंजनसमाधान॥सेवावेंहेंवन
बोलवेना॥२॥ शुद्धमाझाभावहोईलतुझेपाईं॥तरी
घ्वेहेदेईनिवडुनि॥३॥ उचितअनुचितकळोंआलीगो
ष्ट॥तुझेकृपादृष्टीपांडुरंगा॥४॥ तुकाह्मणेमजपाया
सवेंचाड॥सांगसीतेंगोडआहेमज॥५॥३४१९॥
नाहींकंटाळलोंपरिवाटेभय॥करावेंतेंकायनकळतां॥
॥१॥जनवनआह्मासमानचिझालें॥कामक्रोधकेलेपा
वठणी॥२॥षडऊर्मीशत्रुजिंतिलेअनंता॥नामाचिया
सत्ताबळेंतुझ्या॥३॥मुख्यधर्मआह्मासेवकांचाऐसा॥
स्वामिकरीशिरसापाळावेंतें॥४॥ह्मणऊनितुकाअव
लोकीपाय॥वचनाचीपाहेवासयेका॥५॥३४२०॥
वायांवीणवाढविलाहोलौकिक॥आणिलालटिकवा
ददोघां॥१॥नाहींऐसाझालादेवमाझ्यामतें॥भुकेले
जीवींनिकायजाणे ॥२॥ शब्दज्ञानेंगौरविलीहेवैखं

री ॥ साचतें अंतरीं बिंबेचिना ॥ ३॥ झालों परदेशी गेले
दोन्ही ठाय ॥ संसार ना पाय तुझे देवा ॥ ४ ॥ तुकाह्मणे मा
गें कळों येतें ऐसें ॥ न घेतों हें पिसें लावूनियां ॥ ५ ॥
॥३४२१॥
न कळे तत्वज्ञान मूढ माझी मति॥ परिध्यातों चित्तीं चरण
कमळ॥ १ ॥ आगमाचे भेद मी तो काय जाणें ॥ काळ
तों चिंतनें सारितसे ॥ २ ॥ कांहीं नेणें परी ह्मणवितों दास॥
होईल त्याचा त्यास अभिमान ॥ ३ ॥ संसाराची सोय
सांडिल मारग ॥ दुऱ्हाविलें जग येका पायें ॥ ४ ॥ मागि
ल्या लागाचें केलें सें खंडण ॥ येकायेकी मन राखियेलें॥
॥ ५ ॥ तुकाह्मणे अगा रखुमादेविवरा ॥ भक्त करुणाक
रा सांभाळावें ॥ ६ ॥ ॥३४२२॥
संसार सोहळे भ्रमती सकळ ॥ भक्ता याचें फळ विठोबा
चें ॥ १ ॥ भय चित्तीं धाक न मनती मनीं॥ भक्तां चक्रपा
णि सांभाळीत ॥ २॥ पाप पुण्य त्याचें धरूं न शके अंग॥
भक्तांसी श्रीरंग सर्वभावें ॥ ३॥ नव्हती ते मुक्त आवडे सं
सार ॥ देव त्याचा भार सर्व वाहे ॥४॥ तुकाह्मणे देव भक्तां
वेळाईत ॥ भक्त ते निश्चित त्याचियानें ॥ ५॥३४२३॥
देवासी अवतार भक्तांसी संसार ॥ दोहींचा वीचार येक
पणें ॥ १ ॥ भक्तासी सोहळे देवाचिये अंगें ॥ देव त्यांच्या
संगें सुखभोगी ॥ २ ॥ देवें भक्तरूप दिल्हा से आकार॥
भक्तीं त्याचा पार वाखाणिला ॥ ३ ॥ येका अंगें दोन्हीं
झालीं हें निर्माण ॥ देव भक्तपण स्वामीसेवा ॥ ४ ॥ तुका

ह्मणयेथेंनाहींभिन्नभाव ॥ भक्ततोंचिदेवदेवभक्त॥
॥५॥ ॥३४२४॥

हुंबरतीगाईतयाकडेकान ॥ कैवल्यनिधानदेउनिठाके॥ १ ॥ गोपाळाचीपूजाउच्छिष्टकवळी ॥ तेणेंवनमाळीसुखावला ॥ २ ॥ चोरूनियांखायदहींदूधलोणी ॥ भावेंचक्रपाणीगोविलातो ॥ ३ ॥ निष्कामतोझालाकामासीलंपट ॥ गोपिकांचीवाटपाहतसे ॥ ४ ॥ जगदानीइच्छीयेकतुळसीदळ ॥ भावाचासकळविकिलातो ॥ ५ ॥ तुकाह्मणेहेंचिचैतन्यसांवळें ॥ व्यापूनिनिराळेंराहिलेंसे ॥ ६ ॥ ॥३४२५॥

वाढविलेंकांगा ॥ तुह्मीयेवढेंपांडुरंगा ॥ १ ॥ कायहोतीमजचाड ॥ येवढीकरायाचडबड ॥ २ ॥ ब्रह्मसंतर्पण ॥ लोकींकरावेंकीर्तन ॥ ३ ॥ निमित्याचाधणी ॥ तुकाह्मणेनव्हेकोण्ही ॥ ४ ॥ ॥३४२६॥

अलकापुरींत (आळंदी) ब्राह्मण बेताळीस धरणें बैसला तेसमयीं दृष्टांत झाला कीं देहूस तुकोबा जवळ जाणें त्याबद्दल अभंग.

श्रीपंढरीशापतितपावना ॥ येकविज्ञापनापायांपाशीं ॥१॥ आनाथाजीवांचातूंकाजकैवारी ॥ ऐसीचराचरींब्रीदावळी ॥ २ ॥ नसांगतांकळेअंतरींचेंगूज ॥ आतांतुझीलाजतुजदेवा ॥ ३ ॥ आळिकरज्याचेंकरिसीसमाधान ॥ अभयाचेंदानदेऊनियां ॥ ४ ॥ तुकाह्मणेतूंचिखेळेदोहींठाई ॥ नसेलतोंदेईधीरमना ॥ ५ ॥ ३४२७॥

अगायेउदाराअगाविश्वंभरा ॥ रखुमाईच्यावरापांडु
रंगा॥१॥ अगासर्वोत्तमाअगाकृष्णारामा ॥ अगामे
घश्यामाविश्वजनित्या ॥ २ ॥ अगाकृपावंताजीवदा
निदाता॥ अगासर्वसत्ताधरितीया॥३॥ अगासर्वजा
णाअगानारायणा॥ करुणावचनाचित्तद्यावें ॥ ४ ॥
तुकाह्मणेनाहींअधिकारतैसी ॥ सलगीपायांपासींके
लीमागें॥५॥ ॥३४२८॥
नव्हेदासखरा॥परीझालाहाडांगोरा ॥ १ ॥ यासींका
यकरूंआतां॥तूंहेंसकळजाणता ॥ २॥ नाहींपुण्यगां
ठीं॥जेंहेंवेंचूंकोणासाठीं॥ ३॥ तुकाह्मणेकाउपाधी॥
वाढविलीकृपानिधी॥ ४॥ ॥३४२९॥
तुजविणसत्ता ॥ नाहींवाचावदवीता ॥ १ ॥ ऐसेआ
ह्मीजाणोंदास ॥ ह्मणोनिझालोंउदास ॥ २ ॥ तुह्मीदि
ल्हाधीर॥तेणेंमनझालेंस्थीर॥३॥ तुकाह्मणेआड॥के
लोंमीहेंतुझेंकोड॥ ४॥ ॥३४३०॥
कायमीजाणता॥ तुह्माहुनीज्याअनंता ॥ १ ॥ जोहा
करूंअतिशय ॥ कायतुह्मादयानये॥ २ ॥ कायतुजना
हींकृपा॥ विश्वाचियामायबापा ॥ ३ ॥ तुकाह्मणेवा
णी॥ माझीवाढतुह्माहुनी॥ ४॥ ॥३४३१॥
कायज्ञानेश्वरीउणे॥ तिहींपाठविलेंधरणे ॥ १॥ ऐको
नियांलेखीत॥ह्मणेजाणविलीहेमात ॥ २ ॥ जरीजा
णेधनी॥ वदवीसेवकाचीवाणी॥ ३॥ तुकाह्मणेठेवा॥
होतासांभाळावादेवा॥ ४॥ ॥३४३२॥

ठेवोनियांडोई ॥ पाईझालोंउतराई ॥ १ ॥ कारणतेंतुह्मी
जाणा ॥ मीतराळनारायणा ॥ २ ॥ प्रसंगींवचन ॥ दिल्हें
तेंचिखावें अन्न ॥ ३ ॥ तुकाह्मणेभार ॥ तुह्मीजाणाथो
डेंफार ॥ ४ ॥ ॥ ३४३३ ॥
नकोकांहींपडोंग्रंथांचीयेभरी ॥ शीघ्रवतकरीहेंचियेक
॥ १ ॥ देवाचीयेचाढें आळवावेंदेवा ॥ वासदेहभावापा
डोनियां ॥ २ ॥ साधनेंघालितीकाळाचियेमुखीं ॥ गर्भ
वाससेखीनचुकती ॥ ३ ॥ उधाराचामोक्षहोयनव्हेऐ
सा ॥ पतनासीइच्छाआवश्यक ॥ ४ ॥ रोकडीपातली
अंगसंगेजरा ॥ आतांउजगराकोठवरी ॥ ५ ॥ तुकाह्म
णेघालीनामासाठींउडी ॥ पांडुरंगथडीपाववील ॥ ६ ॥
॥ ३४३४ ॥
नाहींदेवापासींमोक्षाचेंगांठोळें ॥ आणोनीनिराळेंघ्या
वेंहातीं ॥ १ ॥ इंद्रियांचाजयसाधोनियांमन ॥ निर्वि
षकारणअसेतथें ॥ २ ॥ उपासपारणीअक्षराचीआठी ॥
सत्कर्माशेवटींअसेफळ ॥ ३ ॥ आदरेंसंकल्पवारीअति
शय ॥ सहजतेंकायदुःखजाणें ॥ ४ ॥ स्वप्नींचीयेघाये
विवळसीवाया ॥ रडेरडतीयासवेंमिथ्या ॥ ५ ॥ तुका
ह्मणेफळआहेमुळापासीं ॥ शरणदेवाशीजायवेगी
॥ ६ ॥ ॥ ३४३५ ॥
त्यजीलेभेटवींआणोनिवासना ॥ दाविल्याचेंजना
कायकाज ॥ १ ॥ आळवावेंदेवाभाकुनिकरुणा ॥ आ
पुलीयामनासाक्षकरीं ॥ २ ॥ नाहींजावेंयावेंदुरोनी

लागत ॥ आहेसाक्षभूतअंतरींचा ॥ ३ ॥ तुकाह्मणेहा
तोआहेकृपासिंधु ॥ तोडीभवबंधुतात्काळीक ॥ ४ ॥
॥ ३४३६ ॥
गोविंदगोविंद ॥ मनालागलीयाछंद ॥ १ ॥ मगगो
विंदतेकाया ॥ भेदनाहींदेवतया ॥ २ ॥ आनंदलेंमन ॥
प्रेमेंपाझरतीलोचन ॥ ३ ॥ तुकाह्मणेआळी ॥ जेविनु
रेचिवेगळी ॥ ४ ॥ ॥ ३४३७ ॥
ज्याचेंजयाध्यान ॥ तेंचिहोयत्याचेंमन ॥ १ ॥ ह्मणवो
निअवघेंसारा ॥ पांडुरंगदृढधरा ॥ २ ॥ समरवूणज्या
चेपाय ॥ उभाव्यापकविटेठाय ॥ ३ ॥ तुकाह्मणेनभा ॥
परताअणूचाहिगाभा ॥ ४ ॥ ॥ ३४३८ ॥
पाहोनियांग्रंथकरावेंकीर्तन ॥ तेव्हांझालेंजाणफळत्या
चें ॥ १ ॥ नाहींतरीवायांकेलीतोंडपिटी ॥ उरीतेशेवटींउर
लीसे ॥ २ ॥ पढोनियांवेदहरिगुणगावे ॥ ठावेतेजाणावे
तेव्हांझाले ॥ ३ ॥ तपतीर्थाटणेंतेव्हांकार्यसिद्धी ॥ स्थीररा
हेबुद्धीहरिचेनामीं ॥ ४ ॥ यागयज्ञादिककायदानधर्म ॥
तरीफळनामकंठींराहे ॥ ५ ॥ तुकाह्मणेनकोकाबाडा
चेभरी ॥ पडोसारधरीहेंचियेक ॥ ६ ॥ ॥ ३४३९ ॥
ज्याचेंखावेंअन्न ॥ त्याचेंकरावेंचिंतन ॥ १ ॥ त्याचेंदि
ल्हेंत्यासीपावे ॥ फळआपणासीफावे ॥ २ ॥ आहेहाआ
धार ॥ नामत्याचेंविश्वंभर ॥ ३ ॥ नाहींरिताठाव ॥ तुका
ह्मणेपसरीभाव ॥ ४ ॥ ॥ ३४४० ॥
संकोचूनिकायझालासीलहान ॥ घेईआपोषणब्रह्मां

डाचें ॥ १ ॥ करुनीपारणेआंचवणेसंसारा ॥ उसीरउ
सीरालाऊंनको ॥ २ ॥ घरकुलानेहोतापाडिलाअंधा
र ॥ तेणेकेलेंफारकासावीस ॥ ३ ॥ झुगारूनिदूरिलप
विलेंकाखें ॥ तुकाह्मणेवाखेकौतुकाचे ॥ ४ ॥

॥ ३४४१ ॥

माझ्याबापेंमजदिधलेंभातुके ॥ ह्मणोनिकौतुकेंक्रीडा
करी ॥ १ ॥ केलीआलीपुढेंबोलिलोंवचन ॥ उत्तमहेंदा
नकेलेंत्याचें ॥ २ ॥ घेऊनीविभागजावेंलवलाह्या ॥
आलेतीत्याठायाआपुलीया ॥ ३ ॥ तुकाह्मणेज्ञानदे
विसमुदाय ॥ करावामीपाययेईनवंदु ॥ ४ ॥ ३४४२ ॥
ज्ञानियाचाराजागुरुमहाराव ॥ ह्मणतीज्ञानदेवतुह्मा
ऐसें ॥ १ ॥ मजपामरासीकायथोरपण ॥ पाईचीवाहाण
पाईबरी ॥ २ ॥ ब्रह्मादिकजेथेंतुह्मावोळंगणे ॥ इतरतु
ळणेकायपुरे ॥ ३ ॥ तुकाह्मणेनेणेयुक्तीचीतेखोली ॥
ह्मणोनिठेवीलीपाईडोई ॥ ४ ॥ ॥ ३४४३ ॥
बोलीलींलेंकुरें ॥ वेडींवांकुडींउत्तरें ॥ १ ॥ कराक्षमाअप
राध ॥ महाराजतुह्मीसिद्ध ॥ २ ॥ नाहींविचारिला ॥
अधिकारम्यांआपुला ॥ ३ ॥ तुकाह्मणेज्ञानेश्वरा ॥ रा
खापायापेंकिंकरा ॥ ४ ॥ ॥ ३४४४ ॥
कायतुह्मींजाणा ॥ करूंआव्हेरनारायणा ॥ १ ॥ तरीया
लटिक्याचिगोई ॥ निवडिलीदुसरेठाईं ॥ २ ॥ कळोअं
तरींचागुण ॥ नयेफुटल्यावांचून ॥ ३ ॥ आणिलेअनुभ
वा ॥ जनांच्याहेज्ञानदेवा ॥ ४ ॥ आणिककोण्हीभीती

त्याच्याचिंतनेविश्रांती ॥ ५ ॥ तुकाह्मणेबीजापोटीं॥
फळतैसेंचिशेवटीं॥ ६॥ ॥३४४५॥
अविश्वासीयाचेंशरीरसुतकी ॥ विटाळपातकीभेदवा
ही॥ १ ॥ कायत्याचावेलजाईलमांडवा॥ होतांभैसाठे
वाआलापूढें ॥ २॥ मातेचासंकल्पव्हावाराजबिंडा ॥
कपाळींचाधोंडाउभाठाके ॥ ३ ॥ तुकाह्मणेजैसाकुच
राचादाण॥परिपाकींजाणखोटाजसा॥४॥३४४६॥
तामसाचींतपेंपापाचीसिदोरी ॥ तमोगुणेभरीघातलें
से॥ १ ॥ राज्यमदआडसुखाचिसंपत्ती ॥ उल्लंघुनिजा
तीनिरयगांवा॥ २ ॥ इंद्रीयेंदमिलींइच्छाजीतीजीवी॥
नागवितीठावीनाहींपुढें॥ ३ ॥ तुकाह्मणेहरिभजनावां
चून॥ करितीतोशीणपाहोंनये॥ ४॥ ॥३४४७॥
हरिकथेवीणइच्छितीस्वहित ॥ हरिजनींचित्तनघाला
तेथें॥१ ॥जाईभंगोनियांआपुलाविश्वास॥अवघिया
नाशकारणाचा॥ २॥ ज्याचीयाबैसावेंभोजनपंगती॥
त्याचीयेसंगतीतैसेखावें ॥ ३॥ तुकाह्मणेकायझालेती
जाणते॥ देवाहिपरतेथोरतुह्मी॥ ४॥ ॥३४४८॥
शेवकेंकरावेंस्वामीचेंवचन ॥ त्यासीहुंतूंपणकामान
ये ॥ १ ॥ घेईलजीवकांसारीलपरतें॥ भंगलीयाचित्तें
सांदिजेना ॥ २ ॥ खद्योतेंदावावीरविकेवींवाट॥ आ
पुलेंचिनीटउसंतावें ॥ ३॥ तुकाह्मणेचितोज्ञानाचासा
गर॥ परिनेटीआगरभिजोंभेदें॥ ४॥ ॥३४४९॥
जयाचियेद्वारींसोन्याचापिंपळ ॥ अंगींऐसेंबळरेडा

बोले ॥ १ ॥ करीलतेंकायनव्हेमहाराज ॥ परिपाहेवीज
शुद्धअंगीं ॥ २ ॥ जेणेंहेघातलीमुक्तीचीगवादी ॥ मेळ
विलीमांदीवैष्णवांची ॥ ३ ॥ तुकाह्मणेतेथेसुखाकाय
उणे ॥ राहेसमाधानेंचित्ताचिया ॥ ४ ॥ ॥३४५०॥
बहुतांछंदांचेबहुवसेजन ॥ नयेवाटूंमनत्यांच्यासंगें
॥ १ ॥ करावाजतनआपुलाविश्वास ॥ अंगींआलारस
आवडीचा ॥ २ ॥ सुखाचीसमाधिहरिकथामाउली ॥
विश्रांतीसाउलीशिणलीया ॥ ३ ॥ तुकाह्मणेबुडेंबांधो
नीदगड ॥ तेथेकायकोडधांवायाचें ॥ ४ ॥ ३४५१॥
हरिकथेनाहीं ॥ विश्वासज्याच्याठाईं ॥ १ ॥ त्याचीवा
णीअमंगळ ॥ कानउंदीराचेंबीळ ॥ २ ॥ सांडोनिहारस ॥
करितीआणीकसायास ॥ ३ ॥ तुकाह्मणेपिसीं ॥ वायां
गेलीकितीऐसीं ॥ ४ ॥ ॥३४५२॥
प्रेमामृताचीधार ॥ वाहेदेवाहीसमोर ॥ १ ॥ ऊर्ध्ववाहि
नीहरिकथा ॥ मुगुटमणिसर्वातीर्था ॥ २ ॥ शिवाचेंजी
वन ॥ जाळीमहादोषकीर्तन ॥ ३ ॥ तुकाह्मणेहरि ॥ श्रु
तिवाणिईचीथोरी ॥ ४ ॥ ॥३४५३॥
आतांमाझ्यामना ॥ हेचिघडोउपासना ॥ १ ॥ ऐसेंक
रींगापांडुरंगा ॥ प्रेमवोसंडेसेअंगा ॥ २ ॥ सर्वकाळनये ॥
वाचेवीटआलाभयें ॥ ३ ॥ तुकाह्मणेवैष्णवांसंगती ॥
हेंचिभोजनपंगती ॥ ४ ॥ ॥३४५४॥
उपासकराडी ॥ तीहींकराविबापुडी ॥ १ ॥ आह्मीविठो
बाचेदास ॥ चिंताझुगारीलीआस ॥ २ ॥ भक्तिच्याउ

ल्कर्पे॥ नाहींमुक्तीचेंतेंपिसें ॥ ३ ॥ तुकाह्मणेबळ॥ अं
गींआमुच्यासकळ॥ ४॥ ॥३४५५॥
करविलीतैसींकिलीकटकट ॥ वांकडेंकींनीटदेवजाणें
॥ १ ॥ कोणाकारणेंहेंझालेंसेंनिर्माण॥ देवाचेंकारण
देवजाणे ॥ २ ॥ तुकाह्मणेमीतोअभिमानावेगळा॥
घालूनीगोपाळांभारअसें॥ ३॥ ॥ ३४५६॥
तुह्मीयेथेंपाठविलाधरणेकरी ॥ त्याचीझालीपरीआई
काते ॥ १ ॥ आतांकायपुढेंवाढऊंविस्तार ॥ झालास
माचारआईकातो ॥ २ ॥ देवाचेंउचितएकादेशअभं
ग॥ महाफळत्यागकरुनिगेला ॥ ३ ॥ तुकाह्मणेसेवा
समर्पुनिपाईं॥ झालोंउतराईंठावें असो॥४॥३४५७॥
ऐकासंतजनउत्तरमाझेंयोवडेबोल ॥ करिलाडतुह्मापु
ढेंहोझणिकोणीकोपाल॥ १ ॥ उपायसाधनऐकाकोण
गतीअवगती ॥ दृढबैसोनिसादरतुह्मीधरावेचित्तीं ॥
॥ २ ॥ धर्मतयासीचजोडेरेज्याचीआधीनभाज ॥
कर्मतयासीचजोडेरेभीतनाहींलाज ॥ ३ ॥ पुण्यतें
जाणारेभाईनोपरउपकाराचें ॥ परपीडापरनिंदाख
रेंपापतयाचें ॥ ४ ॥ लाभतयासीझालामुखींदेवउच्चा
री॥ प्रपंचापाठींगुंतलाहाणीतयासीथोरी ॥ ५॥ सुख
तेंजाणारेभाईनोसंतसमागम ॥ दुःखतेंजाणारेभाई
नोशमतेथेविषम ॥ ६ ॥ साधनतयासीसाधेरेज्याचे
स्वाधीनबुद्धी॥ पराधीनआहेघातरेथोरजाणसंबंधीं॥
॥ ७॥ मानपावेतोआगळामुख्यइंद्रीयराखे ॥ अपमा

नीतो आधररसस्वादचाखे॥ ८ ॥ जाणतातयासीबोलि जेजाणेसिद्धलक्षण ॥ नेणतातयासीबोलिजेवादकरि भूषण॥ ९ ॥ भलातोचियेकजाणारेगयावर्जनकरी॥ बु रानष्टधनमेळवीपरद्वारजोकरी॥ १०॥ आचरीतोअ न्नकाढीरेगाईअतिथीविभाग॥ अनाचारीकरीभोज नम्वाहिनसंतासंग ॥ ११ ॥ स्वहिततेणेंचिकेलेंरेभूतीं देखिलादेव ॥ अनहिततयाचेंझालेंरेआणिअहंभाव॥ ॥ १२ ॥ धन्यजन्मातेचिआलेरेयेकहरिचेदास ॥ धिग तेविषईगुंतलेकेलाआयुष्यानाश ॥ १३ ॥ जोहरितो चियेकजाणारेजाणेसिद्धलक्षण ॥वेडसरुतोभलेरेवर दळभूषणें॥ १४ ॥ बळियाढातोचिजाणारेभक्तिदृढश रीरीं॥ गांब्यातयासीबोलिजेयेकभावनधरी॥ ॥ १५॥ खोलतावचनगुरुचेंजोगिळुनिबैसे ॥ उथळधीरनाहीं अंगींरेह्मणेहोईलकैसें॥ १६॥ उदारतोचीजीवभावरे ठवींदेवाचेपाई॥कृपणतयासीबोलिजेपडेउपाधीठाईं ॥ १७ ॥ चांगलेपणतेंचरेज्याचेंअंतरशुद्ध॥ वोंगळम ळिनअंतरींवाणीवाहेदुर्गंध॥ १८॥ गोडतेंचियेकआ हेरेसारविठ्ठलनाम॥कडुतोसंसाररेलक्षचौऱ्यांसीजन्म ॥ १९ ॥ तुकाह्मणेमनाधरींरेसंतसगतींसोई ॥ नलगे कांहींकरावेंराहेविठ्ठलपाईं॥ २०॥ ॥३४५८॥

॥ येकाखडीअभंग॥

करावाकैवाडकांहीं ॥ नाहींउरीआलीनाहीं॥ १ ॥ स्म रापंढरीचादेव ॥ मनींधरुनियांभाव॥ २ ॥ खचिविलेहे

काळें॥ उगवाललाहेजाळें॥ ३ ॥ गजरनामाचा॥ क
रालवलाहोवाचा॥४॥ घरटीचक्रफेरा॥ जन्ममृत्युचा
भोंवरा॥ ५ ॥ नानाहव्यासाचीजोडी॥ तृष्णाकरीदेश
धडी ॥ ६ ॥ चरणींठेवाचित्त ॥ ह्मणादेवाचेंअंकीत॥
॥७॥ छंदनानापरी॥ कळानपवीजेहरी ॥ ८ ॥ जगा
चाजनिता॥ भुक्तिमुक्तीचाहीदाता ॥ ९ ॥ झणीमाझें
माझें॥ भारवागवीसीवोझें ॥ १० ॥ वाचिकारेंकेली
बुद्धी॥ नाहींतरायाचीशुद्धी॥ ११ ॥टणकधाकुलीं॥ अ
वघींसरतींविठ्ठलीं॥ १२ ॥ठसात्रिभुवनीं॥ उदारहासी
रोमणी ॥ १३ ॥ डगमगीतेवायांजाय॥ धीरनाहींगो
तेखाय॥ १४ ॥ ढळोंनयेजरी॥ लाभघरींचियाघरीं ॥
॥ १५ ॥ नाहींऐसेंराहे॥ कांहींनाशीवंतदेहे ॥ १६ ॥ त
रणाभाग्यवंत ॥ नेटहरीकीर्तनात ॥ १७ ॥ थडीटाकी
पैलतीर॥ वाहेटोकहोयवीर ॥ १८ ॥ दमातीचेनावें॥
अहंकारजायजिवें ॥ १९ ॥ धनधान्यहेवा ॥ नाडकुटुं
बाचीसेवा॥ २० ॥ नामगोविंदाचें॥ ध्यारेहेंचीभाग्य
साचें॥ २१॥परउपकारा॥वेंचाशक्तिनिंदावारा॥ २२॥
फळभोगइच्छा॥ देवआहेजैसातैसा॥ २३ ॥ बरवाऐ
शाछंदें॥ वाचेगोविंदगोविंद ॥ २४ ॥ भविष्याचेमा
था॥ भजननेदावेंसर्वथा॥ २५॥ मागलागलानसंडी ॥
आळसेंमातीघालितांतोंडीं॥ २६ ॥ यशकीर्तिमान॥
तरीजोडेनारायण॥ २७॥ रविलोपेतेजें॥ जरीहारपेहें
दुजें॥ २८ ॥ लकारलाविला॥ अंगींनसतांचिउगला॥

॥ २९ ॥ वासनेचीधाडी ॥ बंदखोडानाडेवेडी ॥ ३० ॥ सारतेंनकळे ॥ कायझांकियेलेडोळे ॥ ३१ ॥ खंतीतेन धरा ॥ होयगाढवकुतरा ॥ ३२ ॥ सायासाचिजोडी ॥ पिकेंकाढीलीयापेडी ॥ ३३ ॥ हातींहितआहे ॥ परीनक रितीपाहे ॥ ३४ ॥ अलंकारलेणें ॥ भारेंतुळसीमुद्राभर णें ॥ ३५ ॥ शांतीकेलीविष्णुदासीं ॥ तुकाह्मणेपाहाकै सी ॥ ३६ ॥ ॥ ३४५९ ॥

अभंगाच्यावत्या उदकांत बुडऊन पांचदिवस उगे चि राहिले तेव्हां छळवादी येऊन फिरोन निषे धाच्या गोष्टी बोलों लागले श्री सन्मुख ते रा दिवस निद्रा केली ते अभंग. १९

भूतबाधाआह्माघरीं ॥ हेतोंआश्चर्यगाहरी ॥ १ ॥ झा लाभक्तीचाकळस ॥ आलेवस्तींशीहेदोष ॥ २ ॥ जागर णाचेंफळ ॥ दिल्हेंजोडूनीतळमळ ॥ ३ ॥ तुकाह्मणेद वा ॥ आजिकळोंआलासीशेवा ॥ ४ ॥ ॥ ३४६० ॥

नाहींजोंवेंचलोंजिवाचीयात्यागें ॥ तोंवरीवाउगेंनये बोलों ॥ १ ॥ जाणविलेंआतांकरीनउद्देश ॥ जोडीकिं वानाशतुमचाजीवें ॥ २ ॥ ठाईचेंचिआलेंहोतेंऐसेंम ना ॥ जावेंऐसेंवनादृढझालें ॥ ३ ॥ तुकाह्मणेमगवेंची नउत्तरें ॥ उदेसिलेंखरेंझाल्यावरी ॥ ४ ॥ ॥ ३४६१ ॥

करूंकवित्वकांनाहींआतांलाज ॥ मजभक्तराजहांस तील ॥ १ ॥ आतांआलायेकानिवाड्याचादिवस ॥ स त्यावीणकाष्ठविसरला ॥ २ ॥ अनुभवावीणकोणकरी

पाप ॥ तरिचसंकल्पलाजलावे ॥ ३ ॥ तुकाह्मणेआतां नधरवेधीर ॥ नव्हेजीवस्थीरमाझामज ॥४॥ ३४६२॥
नाहींआइकततुह्मींमाझेबोल ॥ कासयाहेफोलउफणूं भूस ॥ १ ॥ येसीतेंकरीनबैसलियाठायां ॥ तूंचिबुझा वयाजवळिदेवा ॥२॥ करावेतेकेलेसकळउपाय ॥ आ तांपाहोंकायअझुनीवास ॥ ३ ॥ तुकाह्मणेआलाआ ह्मेसीसेवट ॥ होउनियांनीटपायांपडे ॥४॥ ॥३४६३॥
नव्हेतुह्माजरी ॥ येवढेंकारणमुरारी ॥ १ ॥ मगजैसातै साकाळ ॥ दाटसारावापातळ ॥ २ ॥ स्वामीचेतेसांडि ॥ पुत्र होतांकाळेंतोंड ॥ ३ ॥ शब्दानाहींरुची ॥ मगकोठेतुका वेंची ॥ ४ ॥ ॥३४६४॥
केल्यापुरतीआळी ॥ किंवाहोतेटाळाटाळी ॥ १ ॥ सत्य संकल्पाचेंफळ ॥ हेतोंनदिसेचिबळ ॥ २ ॥ दळणा च्यावोव्या ॥ रित्याखऱ्यामापेंघ्यावा ॥ ३ ॥ जातीउख ळेंचाटुं ॥ तुकाह्मणेराज्यघाटूं ॥ ४ ॥ ॥३४६५॥
पाववेसंतोष ॥ तुह्मीयासाठींसायास ॥ १ ॥ करीआ वडीवचन ॥ पालटुनीक्षणक्षण ॥ २ ॥ द्यावेंअभयदा न ॥ भूमिनपडावेंवचन ॥ ३ ॥ तुकाह्मणेपरस्परें ॥ कांहीं वाढवीउत्तरें ॥ ४ ॥ ॥ ३४६६ ॥
बोलतांवचनअसापाठमोरे ॥ मजभावबळेंकळों आ ले ॥ १ ॥ मागीलतेंनयेअरुचीनेहातां ॥ नाहींवरीसत्ताआ दराची ॥ २ ॥ समाधानासाठींलाविलासेकान ॥ चोर लेंसेमनदिसतसा ॥ ३ ॥ तुकाह्मणेआह्मातुमचेचिफंद

वरदळछंदकळोंयेती ॥ ४ ॥ ॥ ३४६७ ॥
कशासाठींबैसोंकरूनियांहाट ॥ वाउगाबोभाटडांगोरा
हो ॥ १ ॥ कायआलेयेकाजीवाच्याउद्धारें ॥ पावसीउच्चा
रेंकायहोतें ॥ २ ॥ नेदीपाठपरीअन्नेतोनमरी ॥ आपुलि
येथोरीसाठीराजा ॥ ३ ॥ तुकाह्मणेआतांअव्हेरिलेंतरी ॥
मगकोणकरीदुकानहा ॥ ४ ॥ ॥ ३४६८ ॥
माझामजनाहीं ॥ आलाउबगतोकांहीं ॥ १ ॥ तुमच्या
नामाचीजतन ॥ नव्हतांथोरिवाटेशीण ॥ २ ॥ नपडा
वीनिंदा ॥ कानींस्वामिचीगोविंदा ॥ ३ ॥ तुकाह्मणेला
ज ॥ आह्मास्वामीचेंतेंकाज ॥ ४ ॥ ॥ ३४६९ ॥
कांहींमागणेंहेंआह्मा अनुचित ॥ वडिलांचीरीतजाण
तसों ॥ १ ॥ देहतुच्छझालेसकळउपाधी ॥ सेवेपासींबु
द्धीराहिलीसे ॥ २ ॥ शब्दतोउपाधिअचळनिश्चय ॥ अ
नुभवकायनाहींअंगीं ॥ ३ ॥ तुकाह्मणेदेहफाकिलावि
भागीं ॥ उपकारअंगींउरविला ॥ ४ ॥ ॥ ३४७० ॥
मागील्यासपसरींकर ॥ पळतांभरिवारवती ॥ १ ॥ का
यआह्मीनेणोवर्म ॥ केलाश्रमनेणतां ॥ २ ॥ बोलतांब
रेयेतांरागीं ॥ कठिणलागींमागेंमागें ॥ ३ ॥ तुकाह्मणे
येथेबोली ॥ असेचालीउफराटी ॥ ४ ॥ ॥ ३४७१ ॥
असोतुझेंतुजपासीं ॥ आह्मात्यासींकायचाड ॥ १ ॥ वि
रोधेंकांकोंडूंमन ॥ समाधानअसोनी ॥ २ ॥ करावातो
उरेआट ॥ खटपटवाहातसे ॥ ३ ॥ तुकाह्मणेयेउनिरा
गा ॥ कामीविभागामुकेन ॥ ४ ॥ ॥ ३४७२ ॥

आहेतेंचिपुढेंपाहों ॥ बरेआहोंयेथेंचि ॥ १ ॥ कायावा
ढऊनिकाम ॥ उगाचश्रमतृष्णेचा ॥ २ ॥ स्थिरावतां
वेधींबरें ॥ चालीपुरेंपडेना ॥ ३ ॥ तुकाह्मणेवळितांम
न ॥ आह्मांक्षणनलगे ॥ ४ ॥ ॥ ३४७३ ॥
सांगादासनव्हेतुमचामीकैसा ॥ ऐसेंपंढरीशाविचारू
नी ॥ १ ॥ कोणासाठींकेलीप्रपंचाचीहोळी ॥ यापायां
वेगळीमायबापा ॥ २ ॥ नसेलतोद्यावासत्यत्वासीधी
र ॥ नयेबाजूहीरउफराटे ॥ ३ ॥ तुकाह्मणेआह्मांएहि
कपरत्र ॥ नाहींकुळगोत्रतुजविण ॥ ४ ॥ ३४७४ ॥
अनन्यासींठावयेकसर्वकाज ॥ येकावीणदुजेंनेणेचि
त्त ॥ १ ॥ नपुरतांआळीदेशाधडीव्हावें ॥ तेंकायबरवेंदि
सतसे ॥ २ ॥ लेंकराचाभारमाउलीचेशिरीं ॥ निढळते
दूरीधरिलिया ॥ ३ ॥ तुकाह्मणेकितीघातलीलांबणी ॥
समर्थहोऊनिकेवढ्यासाठीं ॥ ४ ॥ ॥ ३४७५ ॥
स्तुतीतरीकायकरूंकोणापासीं ॥ कीर्तितरीकैसीवाखा
णावी ॥ १ ॥ खोट्यातवनाहींअनुवादाचेंकाम ॥ उरला
हाश्रमवरीबरा ॥ २ ॥ ह्मणवावीत्याचीखूणनाहींहा
तीं ॥ अवकळाफजीतीसावकाश ॥ ३ ॥ तुकाह्मणेहेंगे
तुमचेंमाझेंतोंड ॥ होऊनियांलंडआळवितों ॥ ४ ॥
॥ ३४७६ ॥
कांहींचनलगेआदिअवसान ॥ बहुतकठिणदिसतसां
॥ १ ॥ अवघ्याचिमाझ्यावेचविल्याशक्ति ॥ नचलेसी
युक्तिझालीपुढें ॥ २ ॥ बोलिलेंवचनहारपलेंनभीं ॥ उर

लातोउभीआहोंतैसी ॥ ३॥ तुकाह्मणेकांहींनकरावेसें झालें ॥ ठकितचिठेलेंचित्तउगें ॥ ४॥ ॥३४७७॥

रूपींगोवियेलेंचित्त ॥ पाईराहिलेंनिश्चित ॥ १ ॥ तुझी देवाअवघेचिगोमटे ॥ मुखदेखतांदुःखमिटे॥ २ ॥ झा लीइंद्रियांविश्रांति ॥ भ्रमणतांपीडितहोती ॥ ३ ॥ तुकाह्मणेभेटी॥ सुटलिभवबंधाचीगांठी॥ ४॥

॥३४७८॥

उदकांत वह्या बुडविल्या त्या कोरड्या निघाल्या तेव्हां अन्याय झाला ह्मणोन ७ अभंगकेले ते.

थोरअन्यायकेला ॥ तुझाअंतम्यांपाहिला ॥ जनाचि यावोला॥ साठींचित्तक्षोभविलें ॥ १ ॥ भागविलासी केलाशीण॥ अधममीयातिहीन॥ झांकुनिलोचन॥दि वसतेराराहिले॥ २ ॥ अवघेंघालोनिकोडें॥ ताहनभू केचेंसांकडे ॥ योगक्षेमपुढें ॥ तुजकरणेंलागेल॥ ३॥ उदकींराखिलेकागद ॥ चुकविलाजनवाद ॥ तुकाह्म णेब्रीद॥ साचकेलेंआपुलें॥ ४॥ ॥३४७९॥

कृपाळूमाऊली ॥ आह्मादीनाचीसाउली ॥ नावरिन आली॥ बाळवेषेंजवळी ॥ १ ॥ माझेंकेलेंसमाधान॥ रूपगोजिरेंसगुण॥ निववीलेंमन॥ आलिंगनदेऊनि ॥ २॥ कृपाकेलीजनाहातीं ॥ पाईठावदिल्हासंतीं॥ क ळोंनयेचित्तीं ॥ दुःखकैसेंआहेतें ॥ ३ ॥ तुकाह्मणेमी अन्यायी ॥ क्षमाकरींवोमाझेआई ॥ आतांपुढतीका ईतुजनघालींसांकडें ॥ ४॥ ॥३४८०॥